दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. २० एप्रिल, २०२६ | वर्ष - १ | अंक - २०५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

सोमवार दि. २० एप्रिल २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत *२०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, वैशाख मास, शुक्लपक्ष, तृतीया सकाळी ७-२८ पर्यंत, दिवस नक्षत्र– रोहिणी रात्री २-०८ पर्यंत, चंद्र रास - वृषभ, सूर्य रास - मेष, गुरु रास - मिथुन

### शीतल तेजवानीला दिलासा

**पुणे**: मुंढवा येथील चाळीस एकर सरकारी जमीन परस्पर अमेडिया कंपनीला विकताना कोट्यवधींचे मुद्रांक शुल्क चुकवून सरकारची फसवणूक केल्याप्रकरणी मुख्य आरोपी शीतल तेजवानीला बावधन पोलिसांनी केलेली अटक आणि पुणे न्यायालयाने दिलेली पोलिस कोठडी मुंबई उच्च न्यायालयाने बेकायदा ठरवली. अटकेची कारणे कळविली नसल्याने आरोपीच्या घटनात्मक हक्कांचे उल्लंघन झाल्याचा ठपका उच्च न्यायालयाने बावधन पोलिसांवर ठेवला.

## सारांश वृत्त

### मालगाडीचा डबा रुळावरून घसरला

**बोकारो** : झारखंडच्या बोकारो जिल्ह्यात रविवारी एका रेल्वे क्रॉसिंगवर मालगाडीचा एक डबा कारला धडकल्याने रुळावरून घसरला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दामोदर व्हॅली कॉर्पोरेशन (डीव्हीसी) पॉवर प्लांटमधून मालगाडी बाहेर येत असताना, बोकारो औष्णिक पोलीस ठाण्याच्या (बीटीपीएस) हद्दीतील उड्डाणपुलाजवळ हा अपघात झाला, असे त्यांनी सांगितले.

### महिलांच्या नावावर लोकशाहीवर हल्ला

**जम्मू :** काँग्रेसच्या जम्मू आणि काश्मीर शाखेने रविवारी भाजपवर महिला सक्षमीकरणाच्या नावाखाली लोकशाहीवर होणाऱ्या हल्ल्याबद्दल टीका केली. महिलांच्या हक्कांना मर्यादित ठेवता येणार नाही किंवा हेराफेरीचे समर्थन करण्यासाठी त्यांचा वापर करता येणार नाही, असेही काँग्रेसने म्हटले आहे. काँग्रेसच्या प्रवक्त्या नम्रता शर्मा म्हणाल्या की, महिला आरक्षण कायद्यात सुधारणा करणारे विधेयक मंजूर न होणे, हा भाजप निवडणूक चौकटीची राजकीय हेतूने प्रेरित पुनर्रचना रेटण्यासाठी महिलांच्या हक्कांचा शस्त्र म्हणून वापर करत होते.

### ठाण्यात ६ कोटींचे अमली पदार्थ जप्त

**मुंबई :** मुंबई पोलिसांनी रविवारी शेजारच्या ठाणे जिल्ह्यातून ६ कोटी रुपये किमतीच्या एमडीएमए गोळ्या जप्त केल्या आणि अमली पदार्थ वितरण रॅकेटमधील एका महिला सदस्याला अटक केली, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली. अंमली पदार्थ विरोधी पथकाने ५,००० गोळ्यांचा साठा जप्त केला आणि टिटवाळा शहरातून ३५ वर्षीय आरोपीला अटक केली, असे त्यांनी सांगितले.

### सविस्तर माहिती ७ दिवसांत सादर करण्याचे आदेश

# 'टीसीएस'ची मानवाधिकारकडून दखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली** : देशातील अग्रगण्य आयटी कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) यांच्या नाशिक शाखेबाबत समोर आलेल्या गंभीर तक्रारीची राष्ट्रीय मानवाधिकार आयोग (एनएचआरसी) यांनी गंभीर दखल घेतली असून संबंधित यंत्रणांना नोटीस बजावली आहे. या प्रकरणात दाखल एफआयआरमधील संशयितांची नावे स्पष्ट करण्यासह, त्यात कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे का, याबाबत सविस्तर माहिती सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

आयोगाने महाराष्ट्राचे पोलीस महासंचालक, नाशिकचे पोलीस आयुक्त, कामगार आयुक्त तसेच टीसीएसच्या व्यवस्थापनाला नोटीस पाठवून सात दिवसांत 'अॅक्शन टेकन रिपोर्ट' सादर करण्यास सांगितले आहे. या प्रकरणाची सुनावणी मानवाधिकार संरक्षण कायदा, १९९३ अंतर्गत करण्यात आली. 'लीगल राइट्स ऑब्झर्व्हेटरी' या संस्थेने आयोगाकडे दाखल केलेल्या तक्रारीत टीसीएसच्या नाशिक शाखेत धर्मांतर आणि महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक शोषणाशी संबंधित गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तसेच हा प्रकार संघटित स्वरूपात सुरू असल्याचे संकेत मिळत असल्याचा दावा तक्रारीत करण्यात आला आहे. कंपनीतील काही वरिष्ठ मानव संसाधन अधिकाऱ्यांना याची माहिती असूनही त्यांनी योग्य कारवाई न केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

तक्रारीतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'विशाखा मार्गदर्शक तत्त्वां'नुसार अंतर्गत तक्रार समिती स्थापन नसल्याचा आरोप. त्यामुळे महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. ही बाब कॉर्पोरेट गव्हर्नन्समधील गंभीर त्रुटी असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाने राज्य पोलीस यंत्रणेला सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. तसेच टीसीएसच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना कंपनीतील 'पॉश' समितीची माहिती, मागील तीन वर्षांतील उपक्रम आणि प्राप्त तक्रारींचा तपशीलवार अहवाल सादर करण्यास सांगितले आहे.

कामगार आयुक्तांना टीसीएसच्या भारतातील सर्व शाखा, बीपीओ आणि उपकंपन्यांची नोंदणी, परवाने आणि कामकाजासंबंधी माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या चौकशीतून नेमकी तथ्ये काय समोर येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, आयोगाचे सहाय्यक निबंधक ब्रिजवीर सिंह यांनी जारी केलेल्या पत्रानुसार, या प्रकरणाचा अहवाल निश्चित कालमर्यादित सादर करणे बंधनकारक आहे. आयोगाचे सदस्य प्रियंक कानूनगो यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने या प्रकरणात कडक भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे. या घडामोडींमुळे कॉर्पोरेट क्षेत्रातील कार्यस्थळ सुरक्षितता, महिला संरक्षण यंत्रणा आणि नियामक देखरेखीच्या मुद्द्यांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## तामिळनाडूत फटाक्यांच्या कारखान्यात भीषण स्फोट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चेन्नई :** तामिळनाडूतील विरुधुनगर जिल्ह्यातील कट्टनारपट्टी गावात रविवारी फटाक्यांच्या कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटात किमान १६ जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले आहेत, अशी माहिती अग्निशमन व बचाव विभागाने दिली.

प्राथमिक माहितीनुसार, दुपारच्या सुमारास हा स्फोट झाला. त्या वेळी सुमारे ३० कामगार कारखान्यात 'फॅन्सी' फटाक्यांच्या माळा तयार करण्याच्या कामात गुंतले होते. स्फोट इतका तीव्र होता की इमारतीचा काही भाग कोसळला. हा कारखाना गोविंदनल्लूर येथील मुथु मणिक्कम यांच्या मालकीचा असल्याचे सांगितले जात आहे. स्फोटानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. बचाव पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. जखमींना त्वरित विरुधुनगर येथील सरकारी रुग्णालयात हलवण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. काही जखमींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी या दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबीयांप्रती शोक व्यक्त केला आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत, मंत्री के. के. एस. एस. आर. रामचंद्रन आणि थंगम तेन्नारासू यांना घटनास्थळी पाठवण्याचे आदेश दिल्याचे सांगितले. "विरुधुनगर जिल्ह्यातील कट्टनारपट्टी येथे झालेल्या स्फोटात अनेकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. मृतांच्या कुटुंबीयांप्रती माझ्या मनःपूर्वक संवेदना," असे त्यांनी म्हटले आहे.

## इस्लामाबाद शांतता करार तणावाने धोक्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तेहरान** : इराणने होर्मुझ सामुद्रधुनीवर पुन्हा नियंत्रण प्रस्थापित करत निर्बंध कडक केल्यानंतर रविवारी या महत्त्वाच्या जलमार्गातील जहाजवाहतूक पूर्णपणे ठप्प झाली. जागतिक तेलपुरवठ्याच्या सुमारे २० टक्के वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी ही सामुद्रधुनी बंद झाल्याने आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरात मोठी उसळी येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या नाजूक युद्धविरामाच्या पार्श्वभूमीवर ही घडामोड घडल्याने जागतिक स्तरावर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. इराणने अमेरिकेवर युद्धविरामाचे उल्लंघन केल्याचा आरोप करत अचानक आपली भूमिका बदलली आणि सामुद्रधुनीवरील नियंत्रण अधिक कठोर केले. इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने स्पष्ट इशारा देत म्हटले की, परवानगीशिवाय सामुद्रधुनीतून जाणाऱ्या कोणत्याही जहाजावर 'शत्रूसोबत सहकार्य' मानून कारवाई केली जाईल. या इशाऱ्यानंतर जहाजवाहतूक अक्षरशः ठप्प झाली असून अनेक जहाजांना मार्ग बदलावा लागला आहे.

रविवारी पहाटेपासून कोणतेही व्यापारी जहाज पुढे सरकले नसल्याचे सागरी ट्रॅकिंगमधून स्पष्ट झाले आहे. परिणामी शेकडो जहाजे आणि हजारो खलाशी आखातात अडकून पडले आहेत.

### महिला आरक्षणावरून आरोप-प्रत्यारोप

# वडेट्टीवार यांची भाजप-आरएसएसवर टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : महिला आरक्षण विधेयकावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये सुरू असलेला वाद अधिक तीव्र झाला असून काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार टीका केली आहे. महिला सक्षमीकरणाच्या मुद्द्यावर भाजप "दुटप्पी भूमिका" घेत असल्याचा आरोप त्यांनी केला.

महिला आरक्षण विधेयकाच्या पार्श्वभूमीवर देशात राजकीय वातावरण तापले असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर टीका केली होती. त्यानंतर काँग्रेसकडूनही पलटवार करण्यात आला आहे. वडेट्टीवार यांनी भाजपवर मनुवादी विचारसरणीचा आरोप करत, महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर दिशाभूल केली जात असल्याचे म्हटले. ते म्हणाले की, महिला आरक्षणाचा विषय अनेक दशकांपासून प्रलंबित आहे आणि याआधीही काँग्रेसने महिलांना राजकारणात संधी दिली आहे. "पहिली महिला पंतप्रधान, राष्ट्रपती आणि लोकसभा अध्यक्ष काँग्रेसने दिले. महिलांच्या सन्मानाचा इतिहास काँग्रेसचा आहे," असे त्यांनी नमूद केले. परिसीमनाच्या मुद्द्यावरही त्यांनी टीका करत, "महिला आरक्षणाच्या आडून मतदारसंघांचे फेरबदल करून राजकीय फायदा मिळवण्याचा प्रयत्न सुरू आहे," असा आरोप केला.

दरम्यान, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनीही महायुती सरकारमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व किती आहे, असा सवाल उपस्थित केला. या पार्श्वभूमीवर वडेट्टीवार यांनी सत्ताधाऱ्यांना लक्ष्य करत, "महिला सक्षमीकरणाच्या घोषणा आणि प्रत्यक्ष कृती यामध्ये तफावत आहे," असे म्हटले. या वादात खासदार नवनीत राणा यांच्यावरही वडेट्टीवार यांनी टीका केली. "जातीय आणि धार्मिक तेढ निर्माण करणारी वक्तव्ये करून समाजात तणाव निर्माण केला जात आहे," असा आरोप त्यांनी केला. तसेच अशा वक्तव्यांवर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली.

### उधना स्थानकावर प्रचंड गर्दी

# सुरतमधून कामगारांचे मोठ्या संख्येने स्थलांतर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाचा परिणाम आता भारतातील काही भागांमध्ये जाणवू लागला असून, एलपीजीच्या तुटवड्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. या संकटाचा थेट फटका उद्योगधंद्यांना बसला असून, अनेक ठिकाणी उत्पादन ठप्प झाले आहे. परिणामी, मोठ्या संख्येने कामगारांना घरी परतण्यास भाग पडत आहे. या पार्श्वभूमीवर रविवारी सुरत येथील उधना रेल्वे स्थानकावर प्रचंड गर्दी उसळल्याचे चित्र पाहायला मिळाले.

उत्तर प्रदेश आणि बिहारकडे जाणाऱ्या गाड्यांमध्ये जागा मिळवण्यासाठी हजारो प्रवासी स्थानकावर जमा झाले होते. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ लागल्याने पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागला, त्यामुळे काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. असंख्य कामगारांना शहर सोडावे लागत असल्याचे सांगण्यात येत आहे.

एलपीजीच्या कमतरतेचा सर्वाधिक फटका सुरतच्या वस्त्रोद्योगाला बसला आहे. अंदाजे ३ लाख कामगारांनी शहर सोडल्याची माहिती समोर आली आहे. याचा परिणाम उत्पादनावरही झाला असून, ते दररोज सुमारे ६.५ कोटी मीटरवरून ४.५ कोटी मीटरपर्यंत घसरले आहे. उद्योगाला दररोज सुमारे १५ हजार गॅस सिलिंडरची आवश्यकता असते; मात्र पुरवठा अपुरा असल्याने उत्पादनात अडथळे निर्माण झाले आहेत. सकाळी सुमारे साडेअकराच्या सुमारास उधना-हसनपूर गाडी पकडण्यासाठी प्रवासी रांगेत उभे होते. मात्र, काहींनी नियमांचे उल्लंघन करून पुढे जाण्याचा प्रयत्न केल्याने गोंधळ उडाला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून पोलीस आणि रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानांना सौम्य बळाचा वापर करावा लागला.

दुपारपर्यंत सहा गाड्यांद्वारे २१ हजारांहून अधिक प्रवाशांची वाहतूक करण्यात आली होती. वारंवार आवाहन करूनही प्रवासी रांगेत न थांबल्यामुळे कठोर उपाययोजना लागली. या गर्दीमागे उन्हाळ्याच्या सुट्ट्या कारणीभूत नसून, गेल्या काही आठवड्यांपासून सुरू असलेल्या एलपीजी तुटवड्यामुळे रोजगारावर झालेला परिणामही तितकाच महत्त्वाचा आहे, असे समजते.

### २३ एप्रिलला सार्वजनिक सुट्टी

**पुणे** : बारामती आणि राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीसाठी येत्या २३ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेत बारामती व राहुरी मतदारसंघात सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. याबाबतची अधिकृत अधिसूचना सामान्य प्रशासन विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही सुट्टी राज्य व केंद्र शासनाची कार्यालये, निमशासकीय संस्था तसेच सार्वजनिक उपक्रमांना लागू राहणार आहे. जे मतदार कामानिमित्त बाहेर आहेत, त्यांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार आहे.

# मेटामध्ये मोठी कर्मचारी कपात

### मे महिन्यात ८ हजार जणांवर गंडांतर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**न्यूयॉर्क** : सोशल मीडिया क्षेत्रातील आघाडीची कंपनी मेटा प्लॅटफॉर्म्स मे महिन्यात मोठ्या प्रमाणावर कर्मचारी कपात करण्याच्या तयारीत असून सुमारे ८ हजार कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याची योजना आखत आहे. एका अहवालानुसार, ही प्रक्रिया २० मेच्या आसपास सुरू होण्याची शक्यता आहे.

मेटाने सुरुवातीच्या टप्प्यात आपल्या जागतिक कर्मचारीसंख्येच्या सुमारे १० टक्के कपात करण्याचे नियोजन केले आहे. तसेच वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत आणखी काही कर्मचाऱ्यांना कमी केले जाऊ शकते. मात्र, अंतिम आकडेवारी आणि वेळापत्रकात बदल होण्याची शक्यता कंपनीकडून नाकारण्यात आलेली नाही.

कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्क झुकेरबर्ग सध्या कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रावर मोठा भर देत आहेत. एआयमध्ये अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करताना कंपनी कार्यपद्धतीत बदल करत आहे. एआयच्या मदतीने काम अधिक कार्यक्षम होईल आणि व्यवस्थापन स्तर कमी ठेवता येतील, असा कंपनीचा अंदाज आहे. यापूर्वी मेटा एकूण कर्मचारीसंख्येच्या २० टक्क्यांपर्यंत कपात करू शकते, असेही अहवाल समोर आले होते.

दरम्यान, तंत्रज्ञान आणि मीडिया क्षेत्रात कर्मचारी कपातीची लाट कायम आहे. अमेझॉनने नुकतेच ३० हजार कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले. द वॉल्ट डिस्ने मध्येही टीव्ही व्यवसाय, ईएसपीएन आणि तंत्रज्ञान विभागात १ हजार कर्मचाऱ्यांची कपात करण्यात आली. एआयकडे झुकणारी उद्योगांची दिशा, खर्च कपात आणि कार्यक्षमतेवर भर यामुळे कंपन्यांमध्ये कर्मचारी कपात होत असल्याचे दिसून येते.

### अनेक राज्यांत तापमान ४५ अंशांच्या उंबरठ्यावर

# संपूर्ण भारतात आलीये उष्णतेची तीव्र लाट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली** : देशात सध्या तीव्र उष्णतेची लाट उसळली असून अनेक राज्यांमध्ये सूर्य अक्षरशः आग ओकत आहे. उत्तर आणि मध्य भारतातील अनेक भागांत तापमान ४० ते ४५ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले आहे. दरम्यान, हवामान विभागाने येत्या आठवड्यासाठी अंदाज वर्तवताना पुढील काही दिवस उष्णतेची लाट कायम राहणार असल्याचा इशारा दिला आहे. उष्णतेपासून तत्काळ दिलासा मिळण्याची शक्यता नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत शक्यतो घरातच थांबावे, असा सल्ला नागरिकांना देण्यात आला आहे.

उत्तर भारताच्या तुलनेत दक्षिण भारतातील हवामान काहीसे सौम्य राहण्याची शक्यता आहे. पुढील ७२ तासांत दक्षिण महाराष्ट्र, उत्तर कर्नाटक आणि तेलंगणामध्ये मेघगर्जनेसह मुसळधार पावसाचा अंदाज आहे. तसेच अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगाल या ईशान्येकडील राज्यांमध्ये हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पावसामुळे तापमानात काही प्रमाणात घट होऊन नागरिकांना दिलासा मिळू शकतो. याशिवाय पंजाब, उत्तर राजस्थान आणि पश्चिम हरियाणा येथे मेघगर्जनेसह हलक्या सरी पडण्याची शक्यता आहे. मात्र, दिल्ली आणि आसपासच्या मैदानी भागांत उष्णतेपासून विशेष दिलासा मिळण्याची शक्यता नाही.

भारतीय हवामान विभागाच्या निकषांनुसार, जेव्हा तापमान सामान्यपेक्षा किमान ४.५ अंश सेल्सिअसने जास्त होते, तेव्हा 'उष्णतेची लाट' घोषित केली जाते. सध्या उत्तर, मध्य आणि पूर्व भारतातील अनेक भागांमध्ये ही मर्यादा ओलांडली गेली आहे. पूर्व उत्तर प्रदेश, पूर्व मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि विदर्भातील काही भागांत तापमान ४० ते ४५ अंशांपर्यंत पोहोचले आहे. राजस्थान आणि ओडिशामध्येही उष्णतेची लाट शिगेला पोहोचली असून तापमान सामान्यपेक्षा लक्षणीयरीत्या अधिक आहे. या आठवड्यात विदर्भ, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड हे सर्वाधिक उष्ण प्रदेश ठरले आहेत. राजस्थान आणि उत्तर प्रदेशातील काही भागांतही कडक उन्हाचा तडाखा जाणवत आहे. ओडिशा, किनारपट्टीवरील आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूमध्ये उष्णता व आर्द्रतेमुळे उकाडा अधिक जाणवत आहे. जास्त आर्द्रतेमुळे घामाचे बाष्पीभवन कमी होत असल्याने तापमान प्रत्यक्षापेक्षा अधिक भासते.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, ही उष्णतेची तीव्र लाट किमान २२ एप्रिलपर्यंत कायम राहण्याची शक्यता आहे. पूर्व उत्तर प्रदेशात २० एप्रिलच्या सुमारास काहीसा दिलासा मिळू शकतो, तर विदर्भ आणि मध्य भारतात तापमान काहीसे लवकर कमी होण्याची चिन्हे आहेत. राजस्थान आणि ओडिशामध्ये उष्णतेची लाट २२ एप्रिलपर्यंत टिकण्याचा अंदाज आहे, तर झारखंडमध्ये २१ एप्रिलपर्यंत दिलासा मिळण्याची शक्यता नाही. पुढील तीन ते चार दिवसांत मैदानी भागांत उष्णतेपासून दिलासा मिळण्याची कोणतीही स्पष्ट चिन्हे दिसत नाहीत.

## दिनेश त्रिवेदी भारताचे बांगलादेशातील उच्चायुक्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : भारताचे माजी रेल्वेमंत्री दिनेश त्रिवेदी यांनी बांगलादेशमधील भारताचे उच्चायुक्त म्हणून पदभार स्वीकारला आहे. त्यांनी प्रणय वर्मा यांच्याकडून कार्यभार घेतला. वर्मा यांची आता ब्रुसेल्स येथे युरोपीय संघातील भारताचे राजदूत म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

दिनेश त्रिवेदी हे एकेकाळी तृणमूल काँग्रेस मधील प्रभावी नेते होते. ममता बॅनर्जी यांच्या निकटवर्तीयांपैकी ते मानले जात होते. यूपीए सरकारच्या काळात त्यांनी १३ जुलै २०११ ते १८ मार्च २०१२ या कालावधीत रेल्वेमंत्री म्हणून काम पाहिले. मात्र, रेल्वे अर्थसंकल्पातील काही निर्णयांवरून वाद निर्माण झाल्यानंतर त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. यानंतर तृणमूल काँग्रेसमधील त्यांचे महत्त्व कमी होत गेले. १२ फेब्रुवारी २०२१ रोजी त्यांनी पक्षाचा राजीनामा दिला. त्यानंतर ६ मार्च २०२१ रोजी त्यांनी भारतीय जनता पार्टी मध्ये प्रवेश केला. ७५ वर्षीय त्रिवेदी यांची उच्चायुक्तपदी नियुक्ती ही वेगळी मानली जात आहे. साधारणपणे अशा पदांवर परराष्ट्र सेवेतून आलेल्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जाते. मात्र, अनुभवी राजकीय नेत्याला या पदावर संधी देऊन केंद्र सरकारने बांगलादेशसोबतच्या संबंधांना विशेष महत्त्व दिल्याचे संकेत दिले आहेत.

बंगाली संस्कृतीची चांगली जाण आणि पश्चिम बंगालमधील राजकीय अनुभव यामुळे त्रिवेदी भारत-बांगलादेशातील संबंध सुधारण्यात मोलाची भूमिका बजावतील, असे मानले जाते.

## संपादकीय

### 'पाच'चा 'सहा'कार!



**भारतीय अर्थव्यवस्थेच्या जागतिक क्रमवारीत झालेली घसरण ही केवळ तांत्रिक आकडेवारीची बाब नाही, तर ती धोरणात्मक त्रुटींची निदर्शक आहे. ब्रिटनने घेतलेली झेप आणि आपली झालेली पिछेहाट यावर आत्मचिंतन करण्याची वेळ आता आली आहे, कारण केवळ स्वप्नांच्या जोरावर 'पाच ट्रिलियन'ची अर्थव्यवस्था साकारता येत नाही, हे वास्तव आता समोर आले आहे.**

जगाच्या नकाशावर 'सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था' असा डंका पिटणे आणि प्रत्यक्षात विकासदराच्या शर्यतीत पाय लटपटणे, यातील अंतर आता उघड होऊ लागले आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या ताज्या आकडेवारीनुसार, भारताची अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावरून घसरून सहाव्या क्रमांकावर पोहोचली आहे आणि ज्या ब्रिटनला आपण मागे टाकल्याचा जल्लोष काही महिन्यांपूर्वी केला होता, त्याने पुन्हा एकदा आपले स्थान पटकावले आहे. आपल्याकडे आकडेवारीचा वापर हा सत्यापेक्षा सोयीसाठी अधिक केला जातो. त्यामुळेच जेव्हा आपण पाचव्या क्रमांकावर पोहोचलो, तेव्हा तो 'ऐतिहासिक क्षण' ठरवला गेला; पण आता जेव्हा आपण एक पायरी खाली उतरलो आहोत, तेव्हा त्याकडे 'तांत्रिक बदल' म्हणून दुर्लक्ष करणे ही स्वतःचीच फसवणूक ठरेल. अर्थशास्त्राचा एक साधा नियम आहे, तो म्हणजे आकड्यांना भावना नसतात. भारतीय अर्थव्यवस्थेची ही घसरण प्रामुख्याने दोन स्तरांवर तपासणे गरजेचे आहे. पहिले कारण म्हणजे चलनातील चढ-उतार. डॉलरच्या तुलनेत रुपयाचे होणारे अवमूल्यन हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या डॉलरमधील मूल्याला फटका बसवणारे ठरले आहे. ज्या वेळी रुपया कमजोर होतो, तेव्हा जागतिक बाजारपेठेत आपल्या अर्थव्यवस्थेचा आकार कागदावर लहान दिसू लागतो. दुसरे कारण म्हणजे ब्रिटनची अर्थव्यवस्था अपेक्षेपेक्षा वेगाने सावरली आहे. तिथे महागाईचा दर आटोक्यात आला आणि विकासाने वेग घेतला. आपण मात्र, 'आम्हीच विश्वगुरु' या भ्रमात राहिलो आणि वास्तवातील गुंतवणुकीचे प्रमाण कमी होत गेले. आपल्याकडे सध्या एका विचित्र प्रकारचा 'इव्हेंटिझम' फोफावला आहे. कोणतीही साधी सुधारणा झाली की तिचे रूपांतर उत्सवात करायचे आणि मूलभूत प्रश्नांकडे काणाळा करायचा, ही सध्याची सरकारी रीत झाली आहे. पाच ट्रिलियन डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे स्वप्न दाखवले जात असताना, देशांतर्गत उपभोग का घटत आहे, याचा विचार होताना दिसत नाही. ग्रामीण भागातील मागणी थंडावलेली आहे. सामान्य माणसाच्या खिशातील पैसा महागाईने शोषून घेतला आहे. जेव्हा सामान्य माणूस खर्च करणे कमी करतो, तेव्हा अर्थव्यवस्थेच्या चाकाला गती देणारा मुख्य स्रोतच आटतो. हे वास्तव आपण 'मेक इन इंडिया'च्या चकचकीत जाहिरातींखाली दडपून ठेवण्याचा प्रयत्न केला, पण तो फार काळ टिकला नाही. ब्रिटन आणि भारत यांच्यातील या 'शिवाशिवी'च्या खेळात एक कळीचा मुद्दा दुर्लक्षित राहतो, तो म्हणजे 'दरडोई उत्पन्न'. आपण जगातील पाचवी किंवा सहावी मोठी अर्थव्यवस्था असलो, तरी दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत आपण जगात १४० व्या क्रमांकाच्या आसपास आहोत. याचा अर्थ असा की, देशाची श्रीमंती ही मूठभर लोकांच्या हातात एकवटलेली आहे आणि गरिबांची संख्या अफाट आहे. नोटाबंदीचा तडाखा, त्यानंतर जीएसटीची क्लिष्ट अंमलबजावणी आणि कोरोनानंतरच्या काळात सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांकडे झालेले दुर्लक्ष, हे सर्व घटक आता एकत्रितपणे आपला प्रभाव दाखवत आहेत. आपण सेवा क्षेत्रात प्रगती केली असली, तरी उत्पादन क्षेत्रात आपण अजूनही खूप मागे आहोत. अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या धोरणांवर आपले नशीब अवलंबून ठेवण्यापेक्षा, देशांतर्गत उत्पादकता कशी वाढेल, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत क्षेत्रांत गुंतवणूक केल्याशिवाय कोणतीही अर्थव्यवस्था दीर्घकाळ तग धरू शकत नाही. आपण जेव्हा स्वतःला 'जगाचे इंजिन' म्हणवतो, तेव्हा पाठीमागे सुटलेल्या गरिबीच्या डब्यांचे काय, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. अर्थकारण हे राजकारणापेक्षा वेगळे असते, याचे भान राज्यकर्त्यांनी ठेवणे आवश्यक आहे. भाषणांमधून भूक मिटत नाही आणि घोषणांमधून तिजोरी भरत नाही. भारताची अर्थव्यवस्था पुन्हा एकदा प्रगतीपथावर न्यायची असेल, तर केवळ 'आकडेमोड' न करता 'आकड्यांचे मूळ' सुधारण्यावर भर द्यावा लागेल. अन्यथा, 'पाच'चे 'सहा' झाले आहेत, उद्या 'सात' व्हायला वेळ लागणार नाही. जागतिक अर्थव्यवस्थेच्या महामार्गावर आपण टायर पंक्चर झालेली गाडी घेऊन वेगाच्या गप्पा मारत आहोत, हे जितक्या लवकर मान्य करू, तितक्या लवकर दुरुस्ती सुरू होईल. अन्यथा, महासत्तेचे स्वप्न हे निव्वळ 'मृगजळ'च ठरेल.

# 'तेला'ची धार आणि 'सत्ते'चा व्यवहार

जगाच्या राजकारणात 'नैतिकता' हा शब्द केवळ शब्दकोशात आणि शालेय भाषणांत शोभून दिसतो. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र, ज्याच्या हातात 'ऊर्जेचा' दांडा, तोच जगाला आपल्या तालावर नाचवतो. अमेरिकेतील बायडेन प्रशासनाने (आणि आताच्या ट्रम्प राजवटीनेही) रशियन तेलावरील निर्बंधांना दिलेली १६ मे पर्यंतची मुदतवाढ, हे याच 'रिअलपॉलिटिक'चे ताजे उदाहरण. भारतासाठी हा निर्णय वरवर पाहता सुखावह वाटत असला, तरी यामागील कारणांची मिमांसा केली तर 'जागतिक व्यवस्थे'चे क्रूर स्वरूप स्पष्ट होते.

खरे तर, रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाल्यापासून भारताने रशियाकडून तेल खरेदी करणे हे पाश्चात्य जगाच्या डोळ्यात खुपणारे होते. त्या वेळी 'आम्ही लोकशाहीच्या बाजूने की हुकूमशाहीच्या?' असे प्रश्न विचारले गेले. भारताने 'स्ट्रॅटेजिक ऑटोनॉमी' म्हणजेच 'धोरणात्मक स्वायत्तता' असा गोंडस शब्द वापरून आपली बाजू सावरून धरली. पण आता




अमेरिकेने स्वतःहून ही सवलत वाढवून देणे, यात भारतावरचे प्रेम नसून इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्षाने पेटवलेला वणवा कारणीभूत आहे.

इराण-इस्रायल युद्धामुळे पश्चिम आशियातील तेलपुरवठा विस्कळीत झाला आहे. 'स्ट्रेट ऑफ हॉर्मुझ' हा जागतिक तेल व्यापाराचा मुख्य महामार्ग सध्या युद्धछायेखाली आहे. अशा वेळी जर जागतिक बाजारात रशियाचे तेलही पूर्णपणे बंद झाले, तर कच्च्या तेलाच्या किमती प्रति बॅरल १५० डॉलरच्या पार जाण्याची भीती अमेरिकेला आहे. अमेरिकेतील अंतर्गत महागाई ही तिथल्या निवडणुकांचे आणि सत्तेचे भवितव्य ठरवते. त्यामुळे, स्वतःच्या देशात पेट्रोल-डिझेलचे दर गगनाला भिडू नयेत, यासाठी रशियावर 'निर्बंध' असूनही त्याचे तेल बाजारात येऊ देणे, ही अमेरिकेची मजबुरी आहे.

आपल्याकडे मात्र, या निर्णयाचे श्रेय घेण्याची घाई काही मंडळींना झाली असेल. 'पहा, अमेरिकेला भारतापुढे झुकावे लागले' किंवा 'भारताचा जगातला दबदबा वाढला,' अशा प्रकारच्या वावड्या उठवणे सोपे असते. पण वास्तव हे आहे की, ही सवलत केवळ एका महिन्यासाठी, म्हणजे १६ मे पर्यंतच आहे. ही एक प्रकारची 'हप्तेबंदी' आहे. प्रत्येक वेळी अमेरिकेच्या दारात जाऊन आपल्याला या सवलतीची याचना करावी लागते, हे 'विश्वगुरु' बनू पाहणाऱ्या देशासाठी फारसे भूषणावह नाही.

रशियाकडून स्वस्त तेल मिळत असल्याचा फायदा भारतीय तेल कंपन्यांना झाला, यात शंकाच नाही. पण या तेलाचे मूल्य आपण कोणत्या भाषेत मोजतोय? आपण रशियाला रुपयांमध्ये पैसे देतोय आणि तो पैसा रशियाकडे पडून आहे. कारण, रशियाला भारताकडून विकत घेण्यासारखे फार काही नाही.

भारताने अमेरिकेच्या निर्बंधांचे उल्लंघन केले, तर आपल्या बँकिंग क्षेत्राला 'दुय्यम निर्बंधांचा' धोका असतो. त्यामुळेच, जोपर्यंत वॉशिंग्टनचा 'परवाना' मिळत नाही, तोपर्यंत भारतीय रिफायनरीज रशियन तेल जहाजांना स्पर्श करायला घाबरतात. ही 'अदखलपात्र' परावलंबिता आपल्या आर्थिक धोरणाचे अपयश अधोरेखित करते.

**» जागतिक राजकारणात कोणी कोणाचा कायमचा मित्र नसतो आणि शत्रूही नसतो, असतात ते केवळ हितसंबंध. अमेरिकेने रशियन तेलावरील निर्बंधांना दिलेली तात्पुरती मुदतवाढ ही अमेरिकेची एक अपरिहार्य तडजोड आहे.**

भारताची ऊर्जा सुरक्षा ही सध्या एका अशा दोरीवरची कसरत आहे, जिथे एका बाजूला रशियाचे स्वस्त तेल आहे आणि दुसऱ्या बाजूला अमेरिकेची नाराजी. आपण जेव्हा 'आत्मनिर्भरते'च्या गप्पा मारतो, तेव्हा ऊर्जेच्या बाबतीत आपण आजही आयातीवर ८० टक्क्यांहून अधिक अवलंबून आहोत, हे कटू सत्य आहे.

जागतिक अर्थकारणात कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या की भारताची 'चालू खात्यातील तुट' वाढते. महागाई वाढते आणि पर्यायाने रुपयाची घसरण होते. म्हणूनच अमेरिकेने दिलेली ही तात्पुरती सवलत आपल्याला ऑक्सिजनसारखी वाटते. पण हा ऑक्सिजनचा सिलेंडर कोणा दुसऱ्याच्या हातात आहे, याचे भान ठेवणे आवश्यक आहे. मे महिन्यानंतर जर वॉशिंग्टनने ही सवलत नाकारली, तर आपल्याकडे 'प्लॅन बी' काय आहे? रशियाकडून तेल घेण्यासाठी चीनने स्वतःची यंत्रणा उभी केली आहे, तशी आपण करू शकलो आहोत का? याचे उत्तर दुर्दैवाने 'नाही' असेच आहे. अशा प्रत्येक मुदतवाढीच्या वेळी आपण 'वॉशिंग्टन'च्या दाराकडे डोळे लावून बसलेले असू आणि तिकडून मिळणाऱ्या तुकड्याला 'कूटनीतीचा विजय' म्हणत स्वतःची पाठ थोपटून घेत राहू. राजकारण जेव्हा 'तेला'वर फिरते, तेव्हा त्यात पाय घसरण्याची भीती सर्वाधिक असते. भारताने सध्या तरी पाय सावरले आहेत, पण पुढची वाटचाल निसरडी आहे.

# अनधिकृत बांधकामांवर महापालिकेचा हातोडा कायम

## तीन दिवसांत ४५ हजार चौरस फूट अतिक्रमण जमीनदोस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून शहरातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधात धडक मोहीम राबविण्यात येत असून अवघ्या तीन दिवसांत तब्बल ४५ हजार २८९ चौरस फूट क्षेत्रफळावरील अतिक्रमण हटविण्यात आले आहे. १५ ते १७ एप्रिलदरम्यान 'ब', 'क', 'ई', 'फ' आणि 'ग' क्षेत्रीय कार्यालयांच्या हद्दीत एकूण ४६ अनधिकृत बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. शहराच्या नियोजनबद्ध विकासासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही कारवाई



निर्णायक मानली जात आहे.

'ब' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत चिंचवडमधील प्रभाग क्रमांक १८ मध्ये ९ अनधिकृत पत्राशेड व बांधकामांवर कारवाई करत सुमारे २१,७९८ चौरस फूट अतिक्रमण हटविण्यात आले. 'क' क्षेत्रीय कार्यालयाने भोसरी व पुणे-नाशिक महामार्गालगतच्या परिसरात कारवाई करून पत्राशेड आणि आरसीसी बांधकामांसह एकूण सुमारे ३,८०० चौरस फूट क्षेत्र मोकळे केले.

मोशी-डूडूळगाव परिसरात 'ई' क्षेत्रीय कार्यालयाने एका अनधिकृत बांधकामावर कारवाई करून ६५० चौरस फूट क्षेत्रफळ मुक्त केले. 'फ' क्षेत्रीय कार्यालयाने चिखलीतील प्राईम पार्क व शेलार वस्ती परिसरात व्यावसायिक स्वरूपाच्या ८ अनधिकृत बांधकामांवर कारवाई करत ३,६६० चौरस फूट अतिक्रमण हटविले.

'ग' क्षेत्रीय कार्यालयाने सर्वाधिक व्यापक मोहीम राबवत रहाटणी, सिंहगड कॉलनी, सज्जनगड कॉलनी, ज्ञानदीप कॉलनी आणि इतर भागांमध्ये टप्प्याटप्प्याने कारवाई केली. तीन दिवसांत विविध ठिकाणी मिळून सुमारे १५ हजार चौरस फूट क्षेत्रफळावरील अतिक्रमणे हटविण्यात आली. नाल्यांवरील अतिक्रमणांवरही विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. क्षेत्रीय अधिकारी आणि धडक कारवाई पथक, पोलीस बंदोबस्त तसेच यांत्रिक साधनांच्या सहाय्याने निष्कासन प्रक्रिया राबविण्यात आली.

दरम्यान, शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधातील मोहीम पुढेही अधिक तीव्र केली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नियमबाह्य बांधकाम करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# वाहतूक कोंडीने वाहनचालक हैराण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आकुर्डी :** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या 'अ' प्रभाग कार्यालयाजवळील संत ज्ञानेश्वर चौकातील स्वयंचलित वाहतूक सिग्नल यंत्रणा बंद पडल्याने परिसरात वाहतूक कोंडीची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. विस्कळीत वाहतुकीमुळे वाहनचालकांना जीव धोक्यात घालून चौक पार करावा लागत असून स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

हा चौक आकुर्डी, निगडी आणि चिंचवड या प्रमुख भागांना जोडणारा मध्यवर्ती दुवा असल्याने येथे दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. परिसरात महापालिकेचे प्रभाग कार्यालय, रुग्णालये तसेच अनेक शाळा आणि महाविद्यालये असल्यामुळे विद्यार्थी, पालक आणि नागरिकांची सतत ये-जा सुरू असते. सायंकाळच्या वेळी कंपन्यांच्या बसेस, खासगी वाहने, रिक्षा आणि दुचाकींची गर्दी अधिकच वाढते. अशा महत्त्वाच्या चौकातील सिग्नल यंत्रणा सातत्याने बंद पडत असल्याने वाहतुकीचे नियंत्रण पूर्णपणे ढासळले आहे. बेशिस्त वाहनचालकांना मोकळीक मिळत असल्याने परिस्थिती आणखी बिकट होत आहे.

पालिका प्रशासन आणि वाहतूक विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. वेळेत दुरुस्ती न झाल्यास मोठा अपघात घडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे तातडीने सिग्नल यंत्रणा सुरू करून वाहतूक सुरळीत करण्याची मागणी होत आहे.

# क्रांतिवीर चापेकर बंधूंना मनपाचे अभिवादन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क्रांतिवीर दामोदर हरी चापेकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त चिंचवड येथील चापेकर बंधूंच्या समूह शिल्पास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते हा अभिवादन सोहळा पार पडला.

यावेळी बोलताना महापौर लांडगे यांनी क्रांतीवीर चापेकर बंधूंच्या बलिदानाची आठवण करून देत त्यांच्या कार्यातून देशभक्तीची प्रेरणा घेत राहणे आवश्यक असल्याचे सांगितले. चिंचवड गावातील चापेकर बंधु अशाच थोर हुतात्मांपैकी होते. क्रांतिवीर दामोदर हरी चापेकर आणि त्यांचे बंधू वासुदेव व बाळकृष्ण



यांच्या बलिदानामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात स्वातंत्र्यलढ्याला नवी दिशा मिळाली आणि देशभक्तीची ज्योत अधिक प्रखर झाली. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या धगधगत्या इतिहासात चापेकर बंधूनी देशासाठी दिलेले योगदान देशवासियांना सतत प्रखर देशभक्तीची प्रेरणा देत राहील. दामोदर हरी चापेकर तसेच त्यांचे बंधू वासुदेव आणि बाळकृष्ण यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश सत्तेविरुद्ध उभा केलेला लढा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महत्त्वाचा टप्पा ठरला, असे त्यांनी नमूद केले. या अभिवादन कार्यक्रमास उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, माजी महापौर अपर्णा डोके, नगरसदस्य सुरेश भोईर, अनंत कोऱ्हाळे यांच्यासह महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपआयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किरकोळ वादातून ज्येष्ठ महिलेला मारहाण; तिघांविरोधात गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पिरंगुट परिसरात किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून एका ज्येष्ठ महिलेला मारहाण झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी बावधन पोलिस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मिना दशरथ राजकोटिया (वय ६५, रा. पिरंगुट कॅम्प, ता. मुळशी, जि. पुणे) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. १७ एप्रिल २०२६ रोजी दुपारी सुमारे १२ वाजण्याच्या सुमारास पिरंगुट कॅम्प येथील एका मसाला दुकानात ही घटना घडली.

फिर्यादी महिला दुकानात गेल्या असताना पूर्वीच्या




वादातून आरोपी सोना सातळिया हिने त्यांच्याशी शिवीगाळ केली. त्यानंतर जाब विचारताच सोनाने त्यांना हाताने मारहाण केली. यावेळी तिचा भाऊ जयेश सातळिया याने लाकडी दांडक्याने फिर्यादीच्या डाव्या हातावर, मानेवर आणि उजव्या पायावर वार करून जखमी केले. तसेच आणखी एका अज्ञात महिलेनेही शिवीगाळ करून मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या घटनेप्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ११८(१), ११५(२) आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अद्याप आरोपींना अटक करण्यात आलेली नसून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक पवार करीत आहेत.

### पुण्यात पैशांच्या वादातून मारहाण

**पुणे :** चिखली परिसरात कामगारांमधील पैशांच्या वादातून मारहाणीची घटना घडली असून, या प्रकरणी चिखली पोलीस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना १५ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास तळवडे येथील पांडुरंग हॉटेलसमोर घडली. याप्रकरणी सिद्धन्ना बसवराज कमातगी (वय ४३) यांनी फिर्याद दिली आहे.

तक्रारीनुसार, आरोपी राजेश तुकाराम जगताप (वय २४), गणेश रामचंद्र जगताप (वय २२) आणि त्यांच्या एका अनोळखी साथीदाराने पगाराच्या पैशांवरून वाद घालत फिर्यादी व त्यांच्या भावाला शिवीगाळ केली. त्यानंतर हाताने मारहाण करत जखमी केले. तसेच लोखंडी वस्तू आणि दगडाचा वापर करून गंभीर मारहाण केल्याचा आरोप आहे. घटनेनंतर आरोपींनी धमकी देत तेथून पळ काढला.

या प्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

### खूनानंतर कोयत्यांसह दहशत

**पुणे :** विश्रांतवाडी भागात वैमनस्यातून एका तरुणाचा खून केल्यानंतर आरोपींनी कोयते उगारून शिवाजीनगर रेल्वेस्थानक परिसरातील वसाहतीत दहशत माजवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. नागरिकांना धमकावत घरांच्या दरवाज्यांची तोडफोड करण्यात आल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

१५ एप्रिल रोजी मध्यरात्री विश्रांतवाडी परिसरात गौरव तेलंगी याच्यावर कोयत्याने वार करून खून करण्यात आला होता. या प्रकरणी पोलिसांनी तौफिक शेख, राजन दोरास्वामी (दोघे रा. शिवाजीनगर रेल्वेस्थानकाजवळील वसाहत) यांच्यासह काही साथीदारांना अटक केली आहे.

खून केल्यानंतर पसार झालेल्या आरोपींनी शिवाजीनगर रेल्वेस्थानक परिसरातील वसाहतीत शिरून कोयते उगारत दहशत निर्माण केली. 'प्रतिस्पर्धी टोळीतील सराईतांना साथ देऊ नका, अन्यथा जिवे मारू', अशी धमकी त्यांनी नागरिकांना दिली. यानंतर घरांच्या दरवाज्यांवर कोयते आपटून आरोपींनी भीती पसरवली आणि शिवीगाळ करत तेथून पसार झाले.

या घटनेप्रकरणी एका महिलेने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, तिच्या तक्रारीनुसार तौफिक शेख, राजन दोरास्वामी आणि त्यांच्या साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मार्केट यार्डात अनधिकृत आंबा विक्रेत्यांचा सुळसुळाट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** राज्य कृषी पणन मंडळाच्या आंबा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मार्केट यार्ड परिसरात अनधिकृत विक्रेत्यांचा सुळसुळाट झाल्याचे समोर आले आहे. महोत्सव केंद्राच्या गेटबाहेर रस्त्याच्या दुतर्फा उघडपणे आंबा विक्री सुरू असून, या प्रकारामुळे अधिकृत शेतकरी विक्रेत्यांना फटका बसत आहे, तर ग्राहकांची फसवणूक होत असल्याची तक्रार पुढे आली आहे.

विशेष म्हणजे, कोकणातील हापूस म्हणून कर्नाटकातील आंबे विकले जात असल्याचे निदर्शनास आले आहे. या बनावट विक्रीमुळे ग्राहकांची दिशाभूल होत असून महोत्सवातील शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढली आहे. अधिकृत महोत्सवात सहभागी असलेल्या शेतकऱ्यांनी या अनधिकृत विक्रेत्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

गत आठवड्यात पणनमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते आंबा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले होते. यावेळी बाजार समितीने पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात महोत्सवाच्या बाहेरच अनधिकृत विक्री सुरू असल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. मार्केट यार्डात सुरक्षा व्यवस्थेसाठी मोठा खर्च केला जात असतानाही गेटबाहेरील विक्रेत्यांवर नियंत्रण ठेवण्यात अपयश येत असल्याची टीका होत आहे. या विक्रेत्यांना हटविण्यासाठी ठोस कारवाई करण्याची गरज व्यक्त होत आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### इंदापूरमध्ये ३५ लाखांचा गुटखा जप्त

**इंदापूर :** इंदापूर पोलिस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने संयुक्त कारवाई करत विक्रीस बंदी असलेला सुमारे ३५ लाख ५१ हजार ४१६ रुपये किमतीचा गुटखा जप्त केला आहे. गलांडवाडी क्रमांक १ गावाच्या हद्दीत एका बंद टाटा गॅरेजमध्ये ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या गॅरेजमधील गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणात सुगंधी सुपारी गुटखा साठवून ठेवण्यात आल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचत छापा टाकला आणि मोठ्या प्रमाणात गुटखा जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलिस हवालदार अभिजित दत्तात्रय एकशिंगे यांनी फिर्याद दाखल केली असून इंदापूर शहरातील व्यंकटेशनगर येथील शकील इमायतुला काझी याच्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### घर बांधण्याचे स्वप्न दाखवून फसवणूक

**फुरसुंगी :** घर बांधण्याचे आमिष दाखवून एका महिलेकडून तब्बल ६२ लाखांहून अधिक रक्कम उकळून जमीन न देता फसवणूक केल्याचा प्रकार फुरसुंगी परिसरात उघडकीस आला आहे. या प्रकरणी फुरसुंगी पोलीस ठाण्यात दाम्पत्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, परिसरात खळबळ उडाली आहे. सुयोग प्रकाश खळदकर आणि अश्विनी सुयोग खळदकर (दोघे रा. ग्रीन किस्टा सोसायटी, भोसले व्हिलेज, भेकराईनगर, हडपसर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या दाम्पत्यांची नावे आहेत. याप्रकरणी कोपीला शेरबहादुर राणा (वय ४७, रा. गोंधळेनगर, हडपसर) यांनी फुरसुंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. खळदकर याने फुरसुंगी येथील जागा आपल्या नावावर असल्याचे सांगून फिर्यादीकडून वेळोवेळी एकूण ६२ लाखांहून अधिक रक्कम घेतली. मात्र, जागा त्यांच्या नावावर केली नाही. तसेच पैसेही परत केले नाहीत, असे फिर्यादीत म्हटले आहे.

## खंडोबाच्या दर्शनाला धामणी येथे भक्तांची अलोट गर्दी

# अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर चंदनउटी लेपन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील धामणी येथील कुलस्वामी श्री म्हाळसाकांत खंडोबा मंदिरात अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने चंदनउटी लेपन सोहळा भक्तिभावात पार पडला. रविवारी (दि. १९) शेकडो भाविकांनी 'सदानंदाचा येळकोट, येळकोट जय मल्हार'च्या गजरात खंडोबाचे दर्शन घेतले.

अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर खंडेरायाच्या स्वयंभू सप्तशिवलिंगावर चैत्र महिन्याच्या अखेरीस आणि वैशाख महिन्याच्या प्रारंभी वसंत-ग्रीष्म ऋतूतील तिसरी वासंतिक चंदनउटी साकारण्यात आली. खंडोबा, म्हाळसाई आणि बाणाई यांच्या मूर्ती तसेच सप्तशिवलिंगावर करण्यात आलेल्या चंदनउटीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती.



पहाटे चार वाजता घंटानादाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर पहाटे पाच वाजता बारा जोडप्यांच्या हस्ते वसंतपूजा, दुग्धाभिषेक आणि रुद्राभिषेक पार पडले. देवतांना वस्त्रालंकार व सुगंधी फुलांचे हार अर्पण करण्यात आले. त्यानंतर स्वयंभू सप्तशिवलिंग आणि पंचधातूच्या खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांच्या मुखवट्यांवर केशर, दवणा आणि अत्तरमिश्रित चंदनउटीचा लेप करण्यात आला. खंडेरायाला पुरणपोळी, भजी आणि कुरडईचा नैवेद्य दाखवून आरती करण्यात आली.

मंदिर परिसरात अभंग गायन आणि सनईच्या सुरांनी भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित भाविकांच्या कपाळावर चंदनउटी आणि भंडारा लावण्यात आला.

या सोहळ्याचे पौरोहित्य प्रमोद देखणे यांनी केले. मंदिरात झेंडू, गुलाब आणि इतर फुलांची सजावट तसेच आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. पहाटेपासून महिला भाविकांनी मंदिर परिसरात रांगोळ्या काढून उत्सवात रंग भरला. पुणे, नगर, नाशिक, मुंबई तसेच पिंपरी-चिंचवड परिसरातून भाविक दर्शनासाठी आले होते. मंदिर परिसरात तळीभंडार, फुलं आणि पेढ्यांची दुकानेही थाटण्यात आली होती.

धामणी ग्रामस्थांनी सुमारे ६६ वर्षांनंतर, २०२४ पासून परंपरेनुसार गुढीपाडवा, चैत्र पौर्णिमा आणि अक्षयतृतीया या सणांना चंदनउटी लेपन सोहळा पुन्हा सुरू केला असल्याची माहिती देवस्थानच्या वतीने देण्यात आली.

## चिमुरड्याच्या खून प्रकरणातील आरोपी प्रियकर जेरबंद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** प्रेमसंबंधात अडथळा ठरत असल्याच्या रागातून पोटच्या सहा वर्षांच्या मुलाचा खून करणाऱ्या आईला अटक केल्यानंतर तिचा प्रियकरही पोलिसांच्या ताब्यात आला आहे. दक्षिण महाळुंगे पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

राम विनायक कजेवाड (मूळ रा. अंबाजोगाई, जि. बीड) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. या प्रकरणी मृत मुलाची आई बसरिन मेहबूब शेख (वय २७, सध्या रा. कुरुळी, ता. खेड; मूळ रा. बीड) हिला यापूर्वीच अटक करण्यात आली होती.

बसरिन शेख आणि तिचा प्रियकर राम कजेवाड हे मूळचे अंबाजोगाई येथील रहिवासी आहेत. बसरिन ही विवाहित असून ती आपल्या सहा वर्षांच्या मुलगा आवेज शेख याच्यासह मागील चार महिन्यांपासून कुरुळी येथे प्रियकरासोबत राहत होती. मात्र, आवेज हा त्यांच्या संबंधात अडथळा ठरत असल्याने दोघांनी त्याचा खून करण्याचा कट रचला. दि. ४ एप्रिल रोजी रात्री आरोपींनी आवेजचे डोके भिंतीवर आणि जमिनीवर आपटले. त्यानंतर पाण्याच्या बादलीत त्याचे तोंड बुडवून त्याची हत्या केली. गुन्हा लपवण्यासाठी आरोपींनी मुलाचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्याने झाल्याचा बनाव केला. त्यानंतर मृतदेह कारमधून बीड जिल्ह्यातील धर्मापुरी येथे नेण्यात आला. मात्र, मुलाच्या शरीरावरील जखमा पाहून वडील इसाक शेख यांना संशय आला. त्यांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर शवविच्छेदन अहवालात मारहाण व गुदमरल्याने मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी बसरिन शेख हिला ताब्यात घेऊन चौकशी केली असता तिने गुन्ह्याची कबुली दिली. फरार राम कजेवाडचा पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे तिरुपती (आंध्रप्रदेश) आणि अंबाजोगाई येथे पाठलाग केला. अखेर १७ एप्रिल रोजी त्याला अटक करण्यात आली.

# राजगुरुनगरच्या भोपळबुवा यात्रेत ३५९ बैलगाडे धावले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** भोपळबुवा आणि सिद्धेश्वर महाराजांच्या उत्सवानिमित्त राजगुरुनगर शहरातील यात्रा गुरुवार आणि शुक्रवार (दि. १८) उत्साहात पार पडली. यानिमित्त आयोजित बैलगाडा शर्यतीत तब्बल ३५९ बैलगाड्यांनी सहभाग घेत थरार निर्माण केला.



सिद्धेश्वर मंदिर परिसरातील घाटावर दोन दिवस या शर्यती रंगल्या. अंतिम फेरीसाठी मोठ्या संख्येने प्रेक्षकांनी गर्दी केली होती. अव्वल क्रमांक पटकावणाऱ्या तसेच फायनलमध्ये विजयी ठरलेल्या स्पर्धकांना रोख रक्कम आणि वस्तुरूप बक्षिसे देण्यात आली. यात्रेची सुरुवात मांडव डहाळे आणि शोभायात्रेने झाली. रात्री पद्मश्री रघुवीर खेडकर यांच्या तमाशा कार्यक्रमाने वातावरण रंगले. शनिवारी (दि. १९) गढई मैदानावर पारंपरिक कुस्त्यांचा जंगी आखाडाही भरवण्यात आला, अशी माहिती यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष तथा खेड तालुका खरेदी-विक्री संघाचे अध्यक्ष नरेंद्र थिगळे यांनी दिली. बैलगाडा शर्यतीच्या अंतिम फेरीसाठी जिल्हा सहकारी बोर्डाचे अध्यक्ष हिरामण सातकर, ज्येष्ठ नेते नानासाहेब टाकळकर, जिल्हा परिषदेचे गटनेते व बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, माजी सभापती विनायक घुमटकर, संचालक अशोक राक्षे, सुधीर भोमाळे, पंचायत समितीचे उपसभापती मंगेश सावंत, राजगुरुनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे, नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्यासह नगरसेवक आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

खेड तालुक्यातील विविध बैलगाडा घाटांचे काम सुरू असून, राजगुरुनगर घाटात व्यासपीठ आणि बैलगाडा जुंपण्याच्या जागेवर शेड उभारण्यात येणार आहे. पुढील यात्रेपूर्वी हे काम पूर्ण केले जाईल, अशी माहिती आमदार बाबाजी काळे यांनी दिली.

# मंचरमध्ये महसूल शिबिराला अल्प प्रतिसाद

## परिसरातील नागरिकांनी शिबिराकडे पाठ फिरवल्याचे चित्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** कृषी विभागाच्या वतीने चार शेतकऱ्यांना ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले. मात्र, त्याच पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या "छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर" या उपक्रमाला निरगुडसर येथे अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. परिसरातील नागरिकांनी शिबिराकडे पाठ फिरवल्याचे चित्र दिसून आल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



या प्रकारावर जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला. शिबिराच्या ठिकाणी वनपरिक्षेत्र अधिकारी विकास भोसले आणि तालुका कृषी अधिकारी सिद्धेश ढवळे यांच्याशिवाय अन्य जबाबदार अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांनी संताप व्यक्त केला. अशा महत्त्वाच्या उपक्रमासाठी ठोस नियोजन नसल्याची बाब गंभीर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, याच दिवशी दुपारनंतर पंचायत समितीत अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आल्याने महसूल विभाग आणि पंचायत समिती यांच्यात समन्वयाचा अभाव असल्याचे स्पष्ट झाले. या दुहेरी नियोजनाचा परिणाम शिबिराच्या प्रतिसादावर झाल्याची चर्चा उपस्थितांमध्ये होती. या पार्श्वभूमीवर लवकरच प्रांत कार्यालयात सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येणार असून, माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या उपस्थितीत अधिकाऱ्यांना समज दिली जाईल, असा इशारा विवेक वळसे पाटील यांनी दिला.

दरम्यान, पंचायत समिती सदस्य अंकिता अनिल वाळूंज, श्वेता ढोबळे, प्रियांका केतन वाघ तसेच सरपंच व सदस्य यांनीही नाराजी व्यक्त केली. या कार्यक्रमाबाबत कोणतीही अधिकृत माहिती किंवा निमंत्रण देण्यात आले नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता कार्यक्रम आयोजित करणे अयोग्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

याचवेळी आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात घरगुती गॅस वितरण सुरळीत होत नसल्याच्या तक्रारीही समोर आल्या. वारंवार तक्रारी करूनही परिस्थितीत सुधारणा झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. गॅस पुरवठ्यातील विलंब आणि अनियमिततेमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असून, प्रशासनाने तातडीने व्यवस्था सुधारावी, अशी मागणी संदीप वळसे पाटील यांनी केली.

महसूल शिबिरातील नियोजनाचा अभाव, लोकप्रतिनिधींना न दिलेली माहिती आणि गॅस वितरणातील अडचणी या मुद्द्यांमुळे प्रशासनाविरोधात नाराजीचा सूर उमटत असून, संबंधित यंत्रणांनी तातडीने सुधारणा करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट होत आहे.

# विजेचे खांब बनले आहेत धोकादायक



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील पारगाव ते लाखणगाव या रस्त्यावर चिचगाई मळा परिसरात उभे असलेले विजेचे खांब धोकादायक अवस्थेत झुकल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संबंधित खांबांची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

या मार्गावर सुमारे चार ते पाच विजेचे खांब एका बाजूने पूर्णपणे खचले असून ते कोसळण्याच्या स्थितीत आहेत. पारगाव हे तालुक्यातील महत्त्वाचे बाजारपेठेचे गाव असल्याने या रस्त्यावर काठापूर, लाखणगाव, देवगाव आदी गावांतील नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. तसेच शालेय विद्यार्थ्यांचाही या मार्गावरून मोठ्या प्रमाणात प्रवास होत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जोरदार वारे आणि पावसामुळे हे खांब केव्हाही कोसळू शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या पार्श्वभूमीवर पारगावचे माजी उपसरपंच विठ्ठल ढोबळे यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडे निवेदन देऊन या समस्येची तात्काळ दखल घेण्याची मागणी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित यंत्रणांनी त्वरित कारवाई करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मांदळेवाडीत अखंड हरिनाम सप्ताह १२०० ग्रामस्थांना महाप्रसाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील मांदळेवाडी येथे श्री हनुमान मंदिराच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ग्रामस्थांच्या एकजुटीचे दर्शन घडवणाऱ्या या धार्मिक सोहळ्यात चौथ्या दिवशी सुमारे १२०० ग्रामस्थांसाठी बाजरीची भाकरी आणि मासवडीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

दरवर्षीप्रमाणे यंदाही सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून यंदा या उपक्रमाने ३२ व्या वर्षात पदार्पण केले आहे. सोमवार (दि. २४) पासून सुरू झालेला हा सप्ताह सोमवार (दि. २० मे) पर्यंत चालणार असून दररोज हरिकीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप केले जात आहे. गावातील नागरिक मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने या कार्यक्रमात सहभागी होत आहेत.

चौथ्या दिवशी ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने पुढाकार घेत जवळपास १५०० बाजरीच्या भाकऱ्या आणि मासवडीचे जेवण तयार करून उपस्थितांना वाटप केले. या उपक्रमात महिलांसह तरुणांनीही सक्रिय सहभाग नोंदवला. मर्यादित साधनसामग्री असूनही गावकऱ्यांनी दाखवलेली संघटित ताकद आणि नियोजन कौतुकास्पद असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

विशेष म्हणजे मांदळेवाडी हे गाव पूर्णतः पावसाच्या पाण्यावर अवलंबून असून दुष्काळग्रस्त भाग म्हणून ओळखले जाते. अशा परिस्थितीतही ग्रामस्थांनी एकोप्याच्या बळावर हा सप्ताह यशस्वीपणे उभारला आहे. 'एकी हेच बळ' या उक्तीची प्रचीती देणारा हा उपक्रम असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. आंबेगाव तालुक्यासह उत्तर पुणे जिल्ह्यात अखंड हरिनाम सप्ताहासाठी मांदळेवाडीची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.

# ३३ वर्षे सुरू आहे रामनामाचा जप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील जारकरवाडी येथील ज्येष्ठ नागरिक खंडू भाऊ ढोबळे यांनी गेली तब्बल ३३ वर्षे अखंड 'राम' नामाचा जप करत आध्यात्मिक साधनेचे वेगळे उदाहरण घालून दिले आहे. त्यांनी स्वतःच्या हस्ताक्षरात विविध रंगांच्या शाईने आणि आकर्षक रचनेत लिहिलेल्या रामनामाच्या वह्या पाहणाऱ्यांचे विशेष लक्ष वेधून घेत आहेत.

ढोबळे सांगतात की, १९९३ साली किल्लारी येथे झालेल्या भूकंपानंतर त्यांना एक विलक्षण साक्षात्कार झाला. त्या काळात स्वप्नात आलेल्या एका व्यक्तीने "आजपासून रामनामाचा जप सुरू कर" असा संदेश दिल्याचे ते सांगतात. त्या दिवसापासून त्यांनी रामनाम लेखन व जपाची अखंड साधना सुरू केली असून, आजही ती नित्यनेमाने सुरू आहे. सध्या त्यांच्या जवळ फुलस्केप आकाराच्या सुमारे



२० वह्या पूर्णपणे लिहून तयार आहेत. यापूर्वी त्यांनी अशा अनेक वह्या गावोगावच्या ग्रामदैवतांच्या कलशारोहण सोहळ्यांमध्ये तसेच पायाभरणी कार्यक्रमांमध्ये अर्पण केल्या आहेत.

गेल्या पाच वर्षांपासून ते विविध गावांमध्ये होणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहात 'विणेकरी' म्हणून सेवा देत आहेत. मोकळ्या वेळेत रामनाम जप व लेखन करणे हीच त्यांची दिनचर्या बनली असून, या साधनेतून त्यांना आत्मिक समाधान मिळत असल्याचे ते सांगतात.

त्यांनी लिहिलेल्या रामनामाच्या वह्या राम जन्मभूमी अयोध्या येथे जाऊन अर्पण करण्याची त्यांची मनापासून इच्छा आहे. मात्र, त्यासाठी आवश्यक प्रक्रिया व मार्गदर्शनाबाबत माहिती नसल्याने इच्छुकांनी मदत करावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

## चाकण बाजारात एकूण उलाढाल ५ कोटी ९५ लाख रुपये

# कांदा, बटाटा, लसूणची मोठी आवक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**चाकण :** खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये कांदा, बटाटा, कैरी, लसूण व हिरव्या मिरचीची मोठी आवक झाली. भरपूर आवक होऊनही भाव कडाडले. एकूण उलाढाल ५ कोटी ९५ लाख रुपये झाली.



चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ९ हजार क्विंटल झाली. मागील आठवड्याच्या तुलनेत आवक वाढून कांद्याला कमाल भाव ५०० ते १,२०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,५०० क्विंटल झाली. बटाट्याचा कमाल भाव १,३०० रुपयांवर स्थिरावला. लसणाची एकूण आवक ३५ क्विंटल झाली. लसणाला १० हजार रुपये कमाल भाव मिळाला. या आठवड्यात बाजारात कैरीची मोठी आवक झाली. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३७० क्विंटल झाली असून तिला ३ हजार ते ४ हजार रुपये दरम्यान भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा – एकूण आवक ९,००० क्विंटल; भाव क्रमांक १ : १,२०० रुपये, भाव क्रमांक २ : ८०० रुपये, भाव क्रमांक ३ : ५०० रुपये. बटाटा – एकूण आवक १,५०० क्विंटल; भाव क्रमांक १ : १,३०० रुपये, भाव क्रमांक २ : ८०० रुपये, भाव क्रमांक ३ : ५०० रुपये. फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक (क्विंटलमध्ये) व प्रति १० किलोसाठी मिळालेले भाव (कंसात) पुढीलप्रमाणे – टोमॅटो – २९३ (१,००० ते १,६०० रु.), कोबी – १९५ (४०० ते ६०० रु.), फ्लॉवर – २२५ (६०० ते ८०० रु.), वांगी – ८२ (१,००० ते १,५०० रु.), भेंडी – ८४ (१,००० ते २,५०० रु.), दोडका – ५२ (२,००० ते ४,००० रु.), कारली – ५६ (२,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा – ४२ (१,००० ते २,००० रु.), काकडी – ११५ (१,००० ते २,००० रु.), फरशी – २७ (४,००० ते ५,००० रु.), वालवड – ४२ (३,००० ते ५,००० रु.), ढोबळी मिरची – १५२ (३,००० ते ४,००० रु.), चवळी – ३४ (१,५०० ते २,५०० रु.), वाटाणा – २१ (७,००० ते ९,००० रु.), शेवगा – ३८ (१,५०० ते ३,००० रु.), गाजर – १०८ (१,००० ते १,५०० रु.), गवार – ४२ (२,००० ते ३,५०० रु.), आले – १५५ (३,००० ते ४,००० रु.), ओली भुईमूग शेंग – ७० पोती (४,००० ते ५,००० रुपये). पालेभाज्या : चाकण बाजारात पालेभाज्यांची आवक (जुड्यांमध्ये) व भाव पुढीलप्रमाणे – मेथी – ७,१९० जुड्या (१,५०० ते २,००० रुपये), कोथिंबीर – २५,५९५ जुड्या (१,००० ते १,५०० रुपये), शेपू – २,५४५ जुड्या (८०० ते १,२०० रुपये), पालक – ५,१९० जुड्या (३०० ते ६०० रुपये).

## डॉ. छायाताई तांबे यांची आरोग्य समितीवर निवड



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**ओतूर :** पुणे जिल्हा परिषदेच्या ओतूर-धालेवाडी मतदारसंघाच्या सदस्या प्रा. डॉ. छायाताई अतुल तांबे यांची जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या महत्त्वाच्या समितीवर सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे ओतूरसह जुन्नर तालुक्यातील ग्रामीण भागातील आरोग्यविषयक प्रश्न सोडविण्यास गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

डॉ. तांबे यांच्या निवडीबद्दल जुन्नरचे माजी आमदार अतुल बेनके, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य मोहित ढमाले, अंकुश आमले, पंचायत समितीचे माजी सभापती विशाल तांबे, सदस्य प्रशांत डुंबरे यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि कार्यकर्त्यांनी अभिनंदन केले. ग्रामीण भागातील दुर्गम व वंचित घटकांपर्यंत दर्जेदार आरोग्य सुविधा पोहोचविण्यास प्राधान्य देणार असल्याचे डॉ. छायाताई तांबे यांनी सांगितले.

## सारांश वृत्त

### जंगली हत्तींच्या हल्ल्यात मृत्यू

**कोडरमा:** झारखंडच्या कोडरमा जिल्ह्यात रविवारी जंगली हत्तींनी एका ३५ वर्षीय व्यक्तीला चिरडून ठार केल्याचा आरोप आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली. ही घटना सतगवान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कटैया गावात घडली. ही घटना घडली, तेव्हा रोहित नावाचा पीडित व्यक्ती आपल्या शेतातून कळप हाकलण्याचा प्रयत्न करत होता. त्याचा पाय घसरला आणि तो पडला, आणि कळपाखाली चिरडून त्याचा मृत्यू झाला.

### बंगालमधील तापमानात वाढ होणार

**कोलकाता** : पश्चिम बंगालमध्ये आगामी विधानसभा निवडणुकांवरून राजकीय वातावरण तापत असताना, येत्या आठवड्यात राज्यातील दक्षिण जिल्ह्यांमध्ये पाराही सुमारे तीन ते चार अंशांनी वाढणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने रविवारी वर्तवला. उत्तर बंगालमधील सर्व जिल्ह्यांमध्ये पुढील सात दिवसांत कमाल दैनंदिन तापमानात कोणताही मोठा बदल होणार नाही, असे त्यात म्हटले आहे. खालच्या थरात अपेक्षित असलेले कोरडे पश्चिमी आणि वायव्य वारे तसेच मोसमी सौर उष्णतेमुळे, दक्षिण बंगालच्या काही जिल्ह्यांमध्ये २३ एप्रिलपर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहील.

### केरळमध्ये भारनियमन नाही

**पालक्काड** : केरळचे विद्युत मंत्री के. कृष्णनकुट्टी यांनी रविवारी सांगितले की, विजेचा वापर विक्रमी पातळी ओलांडत असूनही राज्यात भारनियमन लागू केले जाणार नाही. पत्रकार परिषदेला संबोधित करताना कृष्णनकुट्टी म्हणाले की, शनिवारी दैनंदिन वीज वापर विक्रमी ११७.१५ दशलक्ष युनिट्सवर पोहोचला, तर कमाल मागणी ६,०३३ मेगावॅटपर्यंत वाढली. त्यांनी सांगितले की, आव्हाने असूनही राज्य सरकारने भारनियमन न करण्याचा निर्णय घेतला आहे. केरळमधील वीज वापर विक्रमी वाढला असल्याने, भारनियमनाची चर्चा सुरू झाली होती. तथापि, ती फेटाळण्यात आली आहे.

## महिला आरक्षणावरून मोदींची टीएमसीवर टीका

# विश्वासघात केल्याची शिक्षा मिळेल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बांकुरा** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तृणमूल काँग्रेसवर (टीएमसी) महिला आरक्षण विधेयकाला विरोध करून महिलांचा 'विश्वासघात' केल्याचा आरोप करत पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत महिला मतदार टीएमसीला 'शिक्षा' देतील, असा दावा केला. बांकुरा जिल्ह्यातील बिष्णुपूर येथे आयोजित सभेत ते बोलत होते.

मोदी यांनी संसद आणि राज्य विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देणाऱ्या विधेयकाला विरोध केल्याबद्दल टीएमसी आणि काँग्रेसवर जोरदार टीका केली. राज्यातील महिला त्यांच्या 'महाजंगलराज'ला आव्हान देत असल्यामुळेच टीएमसीने या कायद्याला विरोध केल्याचा आरोप त्यांनी केला. "टीएमसीला महिला सक्षमीकरण नको आहे. पश्चिम



बंगालमधील महिला मोठ्या संख्येने राजकारणात याव्यात, असे त्यांना वाटत नाही. त्यामुळेच त्यांनी काँग्रेससोबत मिळून या विधेयकाला विरोध केला. या निवडणुकीत राज्यातील महिला टीएमसीला धडा शिकवतील," असे मोदी म्हणाले. लोकसभेत आवश्यक दोन-तृतीयांश बहुमत न मिळाल्याने हे विधेयक मंजूर होऊ शकले नाही. विधेयकाच्या बाजूने २९८, तर विरोधात २३० खासदारांनी मतदान केले. मंजुरीसाठी ३५२ मतांची आवश्यकता होती.

भाजप आणि टीएमसी यांच्यातील फरक स्पष्ट करताना मोदी म्हणाले की, भाजपची ओळख महिला सक्षमीकरण आणि सुरक्षेशी जोडलेली आहे. "विकसित भारताच्या उभारणीत महिलांची भूमिका अधिक व्यापक व्हावी, ही आमची भूमिका आहे. मात्र संसदेत टीएमसीने पुन्हा एकदा पश्चिम बंगालच्या भगिनींचा विश्वासघात केला," अशी टीका त्यांनी केली. यावेळी मोदी यांनी टीएमसीवर 'घुसखोरांना' अनुकूलता दाखवण्याचा आरोपही केला. "घुसखोरांना फायदा पोहोचवण्यासाठी कायदे मोडणारा हा पक्ष महिला सक्षमीकरणाला विरोध करतो. धर्माधारित आरक्षणाला प्रोत्साहन देऊन तो संविधानाच्या भावनेलाच तडा देत आहे," असे ते म्हणाले. तसेच टीएमसी आणि काँग्रेसवर 'आदिवासीविरोधी' असल्याचा आरोप करत त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अपमानाचाही उल्लेख केला. "भाजपने देशाला पहिला आदिवासी राष्ट्रपती दिला, कारण आम्ही आदिवासी समाजाच्या सक्षमीकरणासाठी कटिबद्ध आहोत," असे मोदी म्हणाले.

कुर्मी समाजाच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करत मोदी म्हणाले की, "टीएमसी आपल्या मतपेढीपुरतेच निर्णय घेत आहे." यावेळी त्यांनी पश्चिम बंगालमध्ये भाजप सत्तेवर आल्यास महिलांसाठी विविध योजना राबविण्याचे आश्वासन दिले. गरिबांना मोफत रेशन, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरांसाठी दीड लाख रुपयांची मदत, तसेच आयुष्मान भारत योजनेअंतर्गत ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार देण्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय गर्भवती महिलांना २१ हजार रुपयांची मदत, मुलाच्या जन्मावर ५ हजार रुपये आणि मुलींच्या शिक्षणासाठी ५० हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. पश्चिम बंगाल विधानसभेच्या २९४ जागांसाठी २३ आणि २९ एप्रिल रोजी दोन टप्प्यांत मतदान होणार असून, मतमोजणी ४ मे रोजी होणार आहे.

## मोदींनी देशाची देशाची दिशाभूल केली : ममता

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता** : महिला आरक्षण विधेयकावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची दिशाभूल केल्याचा आरोप करत पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी रविवारी जोरदार पलटवार केला. केंद्र सरकार महिलांना 'ढाल' म्हणून वापरून मतदारसंघ पुनर्रचनेचा अजेंडा रेटत असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला.

ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधानांच्या भूमिकेवर टीका करत, "प्रामाणिकपणे विषय मांडण्याऐवजी राष्ट्राची दिशाभूल करण्याचा निर्णय घेणे अत्यंत दुर्दैवी आहे," असे म्हटले आहे.

लोकसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयक मंजूर न झाल्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांवर टीका केली होती. त्याला उत्तर देताना बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेसने महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वासाठी सातत्याने लढा दिल्याचे स्पष्ट केले.

"तृणमूल काँग्रेसने नेहमीच महिलांना अधिक प्रतिनिधित्व मिळावे यासाठी भूमिका घेतली आहे. संसद आणि राज्य विधानमंडळात आमच्या महिला लोकप्रतिनिधींचे प्रमाण सर्वाधिक आहे. लोकसभेत आमच्या खासदारांपैकी ३७.९ टक्के महिला आहेत, तर राज्यसभेसाठी आम्ही ४६ टक्के महिलांना उमेदवारी दिली आहे," असे त्यांनी नमूद केले.

महिला आरक्षणाला विरोध करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे ठामपणे सांगत बॅनर्जी म्हणाल्या, "मोदी सरकार आपल्या राजकीय स्वार्थासाठी महिलांचा वापर करत आहे. मतदारसंघ पुनर्रचनेच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी महिलांना पुढे केले जात आहे, यालाच आमचा विरोध आहे," असेही त्या म्हणाल्या.

## खर्गे यांचा मोदींवर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : लोकसभेत संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक, २०२६ नामंजूर झाल्यानंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणावर तीव्र टीका केली आहे. माध्यमांच्या वृत्तांनुसार, खर्गे यांनी हे भाषण "चिखलफेक" आणि "उघड खोटेपणा"ने भरलेले "राजकीय भाषण" असल्याचा आरोप केला.

महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण लागू करण्यासाठी लोकसभेच्या जागा ५४३ वरून ८५० पर्यंत वाढवण्याचा प्रस्ताव असलेले हे विधेयक आवश्यक दोन-तृतीयांश बहुमत मिळवू शकले नाही. विधेयकाच्या बाजूने २९८ मते पडली, तर २३० खासदारांनी विरोधात मतदान केले. विधेयक फेटाळल्यानंतर काही तासांतच पंतप्रधान मोदी यांनी राष्ट्राला संबोधित करत विरोधी पक्षांवर जोरदार टीका केली होती. त्यानंतर खर्गे यांनी सोशल मीडियावर प्रतिक्रिया देत पंतप्रधानांवर निशाणा साधला.

"गेल्या १२ वर्षांत दाखवण्यासारखे ठोस काम नसल्याने निराश पंतप्रधानांनी अधिकृत भाषणाचे राजकीय भाषणात रूपांतर केले," असा आरोप खर्गे यांनी केला. तसेच दोन राज्यांतील विधानसभा निवडणुकांपूर्वी शासकीय यंत्रणेचा गैरवापर झाल्याचा आणि आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याचाही त्यांनी दावा केला.

मोदींनी भाषणात काँग्रेसचा ५९ वेळा उल्लेख केला, मात्र महिलांचा उल्लेख अत्यल्प होता. यावरून त्यांचे प्राधान्य स्पष्ट होते. काँग्रेसने २०१० मध्ये राज्यसभेत महिला आरक्षण विधेयक मंजूर केले होते आणि २०२३ च्या कायद्यालाही पाठिंबा दिला होता, असे खर्गे यांनी नमूद केले. तसेच अंमलबजावणीत झालेल्या विलंबावर प्रश्न उपस्थित करत, भाजपला स्वतःचे विधेयक अधिसूचित करण्यासाठी तीन वर्षे लागली, अशी टीका त्यांनी केली.

## मोदींच्या भाषणातून आचारसंहितेचे उल्लंघन?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राष्ट्राला उद्देशून केलेल्या अलीकडील भाषणातून आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन झाल्याचा आरोप करत सीपीआयचे राज्यसभा खासदार पी. संदोश कुमार यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पत्र लिहिले आहे. या प्रकरणात निवडणूक आयोगाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

१९ एप्रिल रोजी पाठवलेल्या पत्रात कुमार यांनी नमूद केले की, पाच राज्यांमध्ये आचारसंहिता लागू असताना पंतप्रधानांचे भाषण




"राजकीय स्वरूपाचे" होते. सक्रिय राजकीय मुद्द्यांवर जनमत प्रभावित करण्याच्या उद्देशाने "पक्षपाती विधाने" आणि "निवडक कथन" करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला.

दूरदर्शन आणि संसद टीव्हीसारख्या सार्वजनिक माध्यमांवर या भाषणाचे प्रसारण केल्याबाबतही त्यांनी आक्षेप घेतला. "सार्वजनिक निधीतून चालणाऱ्या व्यासपीठांचा वापर राजकीय भाषणासाठी करणे हा निवडणूक नियमांचा गंभीर भंग आहे," असे कुमार यांनी पत्रात म्हटले आहे. अशा प्रकारांमुळे निवडणुकीदरम्यान समान संधी राखण्याच्या तत्त्वांना बाधा येते, असे सांगत त्यांनी इशारा दिला की, यावर कारवाई न झाल्यास निवडणूक आयोगाच्या निःपक्षपातीपणावरील जनतेचा विश्वास कमी होऊ शकतो. कुमार यांनी आयोगाला "तात्काळ आणि निष्पक्ष कारवाई" करण्याचे आवाहन केले असून, या प्रकरणाची चौकशी सुरू करून निवडणूक प्रक्रियेची पारदर्शकता आणि पवित्रता जपावी, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, पंतप्रधान मोदी यांनी शनिवारी केलेल्या संबोधनात काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांवर महिला आरक्षण विधेयकाला विरोध केल्याबद्दल टीका करत "महिलांच्या हक्कांची हत्या" केल्याचा आरोप केला होता. महिलांकडून त्यांना कठोर शिक्षा होईल, असा इशाराही त्यांनी दिला होता.

## इराणने उडवली ट्रम्प यांची खिल्ली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली** : इराण आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या राजनैतिक वादाचे आता वैयक्तिक हल्ले आणि सोशल मीडियावरील युद्धात रूपांतर झाले आहे. दक्षिण आफ्रिकेतील इराणी दूतावासाने समुद्रातील एका व्हायरल ऑडिओ क्लिपचा हवाला देत अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांना 'मूर्ख' म्हटल्याने आंतरराष्ट्रीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्स नौदल आणि समुद्रातील जहाजांमधील रेडिओ संवाद असल्याचा दावा करणाऱ्या एका व्हायरल व्हिडिओ आणि ऑडिओ क्लिपमुळे हा वाद सुरू झाला. त्या रेकॉर्डिंगमध्ये एक इराणी नौदल अधिकारी 'मूर्ख' हा शब्द वापरताना ऐकू येतो. सुरुवातीला सोशल मीडियावर असा दावा करण्यात आला की, संबंधित अधिकाऱ्याने हा शब्द स्वतःच्या परराष्ट्र मंत्र्यांसाठी वापरला होता.

हे दावे फेटाळत दक्षिण आफ्रिकेतील इराणी दूतावासाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर थेट प्रतिक्रिया दिली. दूतावासाने लिहिले, "अरे मूर्खा, त्याचा रोख तुमच्या 'मूर्ख' राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याकडे होता. गुगलवर 'मूर्ख' शोधा, म्हणजे तुम्हाला समजेल की तो कोण आहे." या वक्तव्यामुळे वाद अधिकच चिघळला आहे.

सागरी वाहिनी क्रमांक १६ वरून प्रसारित करण्यात आलेल्या रेडिओ संदेशात, इराणी नौदलाने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या जहाजांना इशारा दिला. संदेशात म्हटले आहे, "वाहिनी क्रमांक १६ वरून इराणी सेपाह नौदलाकडून संदेश — होर्मुझची सामुद्रधुनी अद्याप बंद आहे. आम्ही ती आमचे इमाम खामेनी यांच्या आदेशानुसार उघडू, कुठल्याही 'मूर्खाच्या' ट्विट्सच्या आधारावर नाही."

## तृणमूल काँग्रेसने केला इन्कार

# आय-पॅकचे कामकाज स्थगित?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याला काही दिवस शिल्लक असताना तृणमूल काँग्रेसची निवडणूक रणनीती पाहणाऱ्या आय-पॅक संस्थेने राज्यातील कामकाज तात्पुरते स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, या वृत्ताला टीएमसीने फेटाळून लावत आय-पॅकचे काम सुरू असल्याचा दावा केला आहे.

आय-पॅक प्रशासनाने शनिवारी मध्यरात्री कर्मचाऱ्यांना ईमेल पाठवत "काही कायदेशीर कारणांमुळे पश्चिम बंगालमधील कामकाज तत्काळ थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे," असे नमूद केले. तसेच सर्व कर्मचाऱ्यांना २० दिवसांची अल्प रजा घेण्याचे निर्देश देण्यात आले असून ११ मेपर्यंत परिस्थितीचा आढावा घेत पुढील निर्णय घेतला जाईल, असेही सांगण्यात आले. तृणमूल काँग्रेसने या दाव्याला स्पष्ट इन्कार केला आहे. पक्षाने निवेदनात म्हटले की, आय-पॅकचे पश्चिम बंगाल युनिट २०२६ च्या विधानसभा निवडणुकांसाठी प्रचारात पूर्ण क्षमतेने कार्यरत




आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) जानेवारी महिन्यात आय-पॅकशी संबंधित ठिकाणांवर टाकलेल्या छाप्यांचा संदर्भ पुन्हा चर्चेत आला आहे. कोलकात्यातील संचालक प्रतीक जैन यांच्या निवासस्थानासह सॉल्ट लेक येथील कार्यालय आणि अन्य ठिकाणांवर छापे टाकण्यात आले होते. या कारवाईवर मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी तीव्र आक्षेप घेत "राजकीय हेतूने प्रेरित" असल्याचा आरोप केला होता. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयातही सुनावणी झाली असून, केंद्र आणि राज्य यांच्यातील संघर्ष तीव्र झाल्याचे चित्र आहे. न्यायालयानेही काही मुद्द्यांवर बंगाल सरकारला सवाल उपस्थित केले होते.

राजकीय निरीक्षकांच्या मते, मतदानाच्या पहिल्या टप्प्याला अवघे काही तास शिल्लक असताना आय-पॅकने कामकाज थांबवण्याचा कथित निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. २०१९ नंतर तृणमूल काँग्रेसच्या संघटनात्मक रचनेत आय-पॅकची भूमिका मोठी राहिली असून उमेदवार निवडीपासून प्रचारयंत्रणेपर्यंत त्यांचा प्रभाव असल्याचे मानले जाते.

अलीकडेच आय-पॅकचे संचालक विनेश कुमार चंडेल यांना कथित मनी लॉन्डरिंग प्रकरणात ईडीने अटक केली होती. या प्रकरणात आर्थिक अनियमितता, बनावट बिले, असुरक्षित कर्जे आणि 'हवाला' व्यवहारांबाबत तपास सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.

## 'त्या' विद्यार्थ्याचा मृत्यू आर्थिक तणावातून

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कन्नूर** : कन्नूरमधील खासगी दंत महाविद्यालयातील दलित विद्यार्थ्याच्या मृत्यू प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, महाविद्यालय व्यवस्थापनाने हा मृत्यू जातीय भेदभावामुळे नसून मोबाईल ॲपवरील कर्जाच्या तणावातून झाल्याचा दावा केला आहे.

वैद्यकीय संचालक डॉ. अदनान सिद्दीक यांनी रविवारी जारी केलेल्या निवेदनात हा दावा करण्यात आला. अंजराकंडी येथील या महाविद्यालयात शिकणारा पहिल्या वर्षाचा विद्यार्थी नितीन राज याला १० एप्रिल रोजी इमारतीवरून पडलेल्या अवस्थेत आढळले होते. त्यानंतर उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेनंतर नितीनला जात आणि रंगावरून छळ केल्याचे आरोप पुढे आले होते. त्यानुसार पोलिसांनी दोन प्राध्यापकांविरोधात आत्महत्येस प्रवृत्त करणे तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. मात्र, महाविद्यालय प्रशासनाने हे आरोप फेटाळले आहेत. "नितीन, त्याचे कुटुंब किंवा वर्गमित्रांकडून जातीय भेदभावाबाबत कोणतीही तक्रार करण्यात आलेली नव्हती," असे निवेदनात म्हटले आहे. एका शिक्षकाकडून अयोग्य टिप्पणी झाल्याचा उल्लेख करत, त्या शिक्षकाच्या वर्गात जाण्याबाबत नितीनने सकारात्मक भूमिका घेतली होती, असेही प्रशासनाने स्पष्ट केले.

महाविद्यालयाने सांगितले की, त्यांनी पोलिसांना सीसीटीव्ही फुटेज, नितीनने वडिलांना लिहिलेली पत्रे आणि परीक्षेचे कागद सुपूर्द केले आहेत.

व्यवस्थापनाच्या मते, नितीनने मोबाईल ॲपद्वारे कर्ज घेतले होते. त्यानंतर कर्ज देणाऱ्या कंपन्यांकडून एका शिक्षिकेला वारंवार फोन व संदेश येऊ लागले. याबाबत तिने प्राचार्यांकडे तक्रार केली. नंतर नितीनला प्राचार्यांच्या कार्यालयात बोलावण्यात आले असता, हे कर्ज त्याने आपल्या मेहुण्यासाठी घेतल्याचे त्याने सांगितले.

या प्रकरणात शिक्षकाचे नाव संदर्भ यादीतून काढण्यास सांगितले गेले होते. मात्र, नितीनने आपण असे नाव दिले नसल्याचा दावा केला होता. संबंधित मेहुण्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला, पण तो निष्फळ ठरल्याचेही प्रशासनाने म्हटले आहे.

## बस दरीत कोसळली; २ ठार, ३१ जखमी

**अजमेर** : राजस्थानच्या अजमेर जिल्ह्यात रविवारी एक प्रवासी बस दरीत कोसळल्याने दोन महिलांचा मृत्यू झाला आणि ३१ जण जखमी झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. पुष्करजवळ जेव्हा हा अपघात घडला, तेव्हा ३३ प्रवाशांना घेऊन जाणाऱ्या बसवरील चालकाचे नियंत्रण सुटले. पुष्कर घाटी परिसरात अनियंत्रित बस आली आणि झाडे व झुडपांमध्ये अडकून दरीत कोसळली. प्रवासी अजमेरहून पुष्करकडे एका सामाजिक कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी जात होते.

## पलानीस्वामींची डीएमकेवर टीका

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**तिरुचेंगोडे** : लोकसभेत संविधान (१३१ वी दुरुस्ती) विधेयक फेटाळल्यानंतर काही दिवसांनी पलानीस्वामी यांनी तामिळनाडूमधील स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील डीएमके सरकारवर जोरदार टीका केली. महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण देणाऱ्या विधेयकाला विरोध करून डीएमके-काँग्रेस आघाडीने महिलांच्या हक्कांना अडथळा आणल्याचा आरोप त्यांनी केला.

तिरुचेंगोडे मतदारसंघातील सभेत बोलताना त्यांनी म्हटले की, "केंद्राने महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा प्रस्ताव ठेवला होता. मात्र डीएमकेने मित्रपक्षांसोबत मिळून त्याला विरोध केला आणि विधेयक पाडले.

राज्यातील महिला त्यांना कधी माफ करतील का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

पलानीस्वामी यांनी दावा केला की, पंतप्रधान मोदी यांनी सल्लामसलत करूनच हे विधेयक मांडले होते आणि एआयएडीएमकेने त्यास समर्थन दिले होते. "केंद्राची भूमिका तामिळनाडूच्या हिताची होती, तरीही डीएमकेने विरोध केला," असे ते म्हणाले. मतदारसंघ पुनर्रचनेमुळे दक्षिणेकडील राज्यांवर परिणाम होईल, या भीतीमुळे डीएमकेसह विरोधकांनी या विधेयकाला विरोध केला होता.

पलानीस्वामी यांनी मात्र केंद्राने दिलेल्या आश्वासनाचा उल्लेख करत तामिळनाडूचा वाटा कमी होणार नसल्याचा दावा केला. "जागा ३९ वरून ५९ झाल्यास राज्याचा टक्का वाढू शकतो," असे त्यांनी सांगितले.

## एसआयआर मोहीम बंगालमध्ये निर्णायक ठरणार

# ९१ लाख नावे वगळल्याने निवडणुकीचा अजेंडा बदलला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता** : पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीचा सूर अचानक बदलला असून, भ्रष्टाचार, रोजगार आणि सत्ताविरोधी मुद्द्यांऐवजी आता ओळख, नागरिकत्व आणि मतदार याद्यांमधील नावे वगळण्याचा प्रश्न केंद्रस्थानी आला आहे. मतदार यादीच्या विशेष सखोल पुनर्तपासणीतून (एसआयआर) तब्बल ९१ लाखांहून अधिक नावे वगळल्यानंतर हा बदल प्रकर्षाने जाणवत आहे.

या प्रक्रियेमुळे राज्यातील एकूण मतदारसंख्या सुमारे १२ टक्क्यांनी घटल्याचे चित्र असून, त्यामुळे राजकीय वातावरण



पूर्णपणे ढवळून निघाले आहे. निवडणूक आयोगाने वगळलेल्या मतदारांबाबत धार्मिक तपशील जाहीर केलेला नसला, तरी राजकीय पक्षांच्या अंदाजानुसार सुमारे ३१ लाख मुस्लिम आणि ६१ लाख हिंदू मतदारांची नावे यामध्ये आहेत. त्यामुळे या मुद्द्याला जातीय आणि राजकीय रंग चढला आहे.

काही महिन्यांपूर्वीपर्यंत भाजपने ही निवडणूक तृणमूल काँग्रेसच्या कथित गैरकारभार, नोकरी घोटाळे, महिलांची सुरक्षा आणि बेरोजगारी याभोवती केंद्रित ठेवण्याची रणनीती आखली होती. दुसरीकडे, तृणमूल काँग्रेस 'लक्ष्मीर भंडार', 'दुआरे सरकार' यांसारख्या कल्याणकारी योजनांच्या बळावर आणि बंगाली अस्मितेच्या मुद्द्यावर प्रचार करत होती. मात्र, मतदार यादीतील मोठ्या प्रमाणातील वगळण्यामुळे हे पारंपरिक मुद्दे दुय्यम ठरले आहेत.

आता प्रचारात "वगळलेली नावे", "नागरिकत्व", "घुसखोर", "परदेशी" आणि "बनावट मतदार" हेच प्रमुख शब्द बनले आहेत. निवडणुकीचा गाभा देखील बदलला असून, ही लढत केवळ सत्तांतराची राहिलेली नसून मतदार म्हणून ओळख टिकवण्याची बनली आहे.

राजकीय विश्लेषक सुमन भट्टाचार्य यांच्या मते, "ही निवडणूक आधी सत्ताविरोधी वाटत होती. आता ती 'खरा मतदार कोण' आणि 'कोणाचे नाव वगळले गेले' या प्रश्नांवर केंद्रित झाली आहे. वगळलेल्या नावांमुळे निर्माण झालेल्या भावनांची ही लढाई आहे."

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनीही आपल्या प्रचाराचा सूर बदलत "हक्क", "अस्मिता" आणि "घटनात्मक संरक्षण" या मुद्द्यांवर भर देण्यास सुरुवात केली आहे. भाजपकडून मात्र या प्रक्रियेचे समर्थन केले जात आहे. देबजित सरकार यांनी सांगितले की, "ही कारवाई बनावट नावे आणि घुसखोरांना हटवण्यासाठी आहे. खऱ्या मतदारांना घाबरण्याचे कारण नाही."

डाव्या आघाडीने भाजप आणि टीएमसी या दोन्ही पक्षांवर टीका करत म्हटले आहे की, बेरोजगारी, महागाई आणि भ्रष्टाचार या मूळ प्रश्नांवरून लक्ष विचलित करण्यासाठी एसआयआरचा मुद्दा पुढे आणला जात आहे.